# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४/११/२०२३ (शुक्रवार)

---

## रेती चोरी

**पोलीस स्टेशन अरोली** :– अंतर्गत मौजा पिंपळगाव सुर नदीचे पुल १६ कि.मी. पुर्व, दिनांक २३/११/२३ चे ००/५० वा ते ०२/१० वा दरम्यान, यातील आरोपी नामे– १) निखील नामदेव सपाटे वय २० वर्ष रा सिरसोली २) आनंदराव चिंधुजी बांते वय ५२ वर्ष रा. पिंपळगाव हे त्यांच्या ताब्यातील बिना क्रमांकाचा ट्रॅक्टर, मुंडा व ट्राली क्र एम.एच.४० ए.एम.२००९ **किं. ५,००,०००/रू मध्ये ०१ ब्रास रेती कि. ५०००/रू असा एकुण ५,०५,०००/रू चा माल अवैधरित्या** विनापरवाना रेती वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सदरचा गुन्हा नोंद

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोलीस उपनिरीक्षक सुशीलकुमार सोनवाने पोस्टे अरोली यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी नामे–१) निखील नामदेव सपाटे वय २० वर्ष रा सिरसोली २) आनंदराव चिंधुजी बांते वय ५२ वर्ष रा. पिंपळगाव यांचेविरूध्द कलम ३७९, १०९ भादवी सह कलम ४८(८) महा.ज.म. १९६६ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/ निखारे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन रामटेक** :– अंतर्गत मौजा खुमारी १५ कि.मी पश्चिम, दिनांक २०/११/२३ चे १९/०० ते १९/१५ वा दरम्यान, फिर्यादीची आई मृतक नामे– प्रेमाबाई साहादेव पाली वय ६२ वर्षे रा. खुमारी ही दुकानातुन सामान घेवुन रोड ओलांडत असता मोटर सायकल. क्र.एम एच ४९ सी.बी. ५९६५ चे चालकांने आपल्या **ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अपघात केला. तिला दवाखान्यात घेवुन जात आहे, असे फिर्यादीचे मामेभाउ यांनी फोनवर सांगितले आणि नंतर २० ते २५ मिनिटांनी फिर्यादीची आई मरण पावल्याचे सागितले**.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ.रेणु पुरण हरणे वय–४० वर्षे रा. आजनी कामठी वार्ड क्र. १ ता. कामठी जि.नागपुर मो.नं. ९३२५७६९५८९ यांचे रिपोर्टवरुन पोस्टे रामटेक येथे मोटर सायकल चालक आरोपी नामे– वंश रामकृष्ण देठे वय–२० वर्षे रा.पारडी नागपुर ता.जि.नागपुर यांचे विरूध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनी यावले पोस्टे रामटेक मो.क्र. ७५८८८ ८१०८१ हे करीत आहे.